<u>राज्य योजना सन २०१५-१६</u>

हक्क व विशेषाधिकार निर्धारित करणे-राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन या योजनेकरीता (२४०६-२२४१) निधी वितरीत करणे.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०६१५/प्र.क्र.१६७/फ-१

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :-१९ जानेवारी, २०१६.

<u>वाचा :-</u>

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.३९/३००/२०१५-१६, दिनांक २८.०५.२०१५.
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १७.०४.२०१५.
३. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०६१५/प्र.क्र.१६७/फ-१, दिनांक ११.०६.२०१५.
४. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक:-अर्थसं-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थ-३,दिनांक ०१.०१.२०१६.
५. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १२.०१.२०१६.
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-२२(६) / योजना/ प्र.क्र. ३२/५०३२/२०१५-१६, दिनांक १८.०१.२०१६.

<u>प्रस्तावना :-</u>

विशेषाधिकार निर्धारित करणे-राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन या योजनेकरीता (२४०६-२२४१) या लेखाशिर्षांतर्गत रुपये ३०००.०० लक्ष नियतव्यय मंजूर असून त्यापैकी रु. २१००.०० लक्ष नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला होता. त्याअनुषंगाने संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी रू. २०४८.४४ लक्षचा प्रस्ताव सादर केला होता. वित्त विभागाच्या संदर्भीय परिपत्रक क्रमांक २ अन्वये सन २०१५-१६ करीता योजनेअंतर्गत विशेषाधिकार निर्धारित करणे-राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन या योजनेकरीता (२४०६-२२४१) मधील विहीत प्रयोजनाखाली अर्थसंकल्पित निधीच्या ७० % मर्यादेत संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये रु. १४७०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

२. सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनात मंजूर नियतव्यय रु. ३०००.०० लक्षपैकी अर्थसंकल्पित न करण्यात आलेला नियतव्यय रु. ९००.०० लक्ष नियतव्यय पुरवणीमागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. संदर्भ क्रमांक ४ व ५ च्या परिपत्रकानुसार वित्त विभागाने पूरवणी मागणीच्या ५०% म्हणजे रु. ४५०.०० लक्ष निधी वित्त विभागाने अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) वर उपलब्ध करुन दिला आहे.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक ६ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे सदर शासन निर्णयान्वये रु. १००.०० लक्ष “ **कोयना अभयारण्यातील ५**

प्रकल्पग्रस्त गावांचे मौजे एकसाल व सागांव, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील पुनर्वसीत ठिकाणी सुविधा राबविण्यासाठी " व रु. ३५०.०० लक्ष **" टिपेश्वर अभयरण्यातील मारेगाव ह्या गावाच्या पुनर्वसनासाठी "** असे एकूण रु. ४५०.०० लक्ष निधी खर्च करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सदर योजनेवर खर्ची टाकावयाची रक्कम सन २०१५-१६ मध्ये लेखाशिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीव राज्य योजनांतर्गत योजना (००) (११) हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे, राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये गावातील पुनर्वसन (राज्य) (२४०६-२२४१) अंतर्गत उद्दिष्टनिहाय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.
२. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.
३. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.
४. प्रस्तावित असलेल्या मोठया बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची जबाबदारी संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील. कोणत्याही प्रकारची वित्तीय अनियमितता होऊ न देण्याचीही जबाबदारी त्यांची असेल.
५. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व दिनांक १७.०४.२०१५, दिनांक ०१.०१.२०१६ व दिनांक १२.०१.२०१६ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थ-३, दिनांक ०१.०१.२०१६ व क्रमांक :- अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १२.०१.२०१६ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२०१२३०३३५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

APTE ARVIND SHANKAR

Digitally signed by APTE ARVIND SHANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT,CID - 918010, postalCode=400032, st=Maharashtra, cn=APTE ARVIND SHANKAR
Date: 2016.01.20 12:31:52 +05'30'

(अरविंद आपटे)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर

३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर.,
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई,
६. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
७. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे.
८. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), यवतमाळ
९. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर
१०.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

****

शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०६.१५/प्र.क्र.१६७/फ-१, दिनांक १९ जानेवारी, २०१६ सोबतचे मासिक निधी विवरण पत्र.

(रक्कम रु. लाखात)

अ.क्र.	लेखाशिर्ष २४०६-८२०१	अर्थसंकल्पित निधी	जानेवारी, २०१६	एकूण
१	२	३	४	५
१	५०-इतर खर्च	३०००.००	४५०.००	४५०.००

****